RNI. MAHMUL02937/2010/35848 **IMPACT FACTOR - 3.38** ISSN 2229-6190

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIII, Vol. II
Year - VII (Half Yearly)
(Nov. 2016 To April 2017)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** - (02382) 241913
09423346913 / 09503814000
09637935252 / 07276301000

**Webside**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College, Latur, Dist. Latur (M.S.) India.

**EDITOR**

**Dr. Dileep S. Arjune**
Head, Dept. of Economics,
J.E.S. College,
Jalna, Dist. Jalna (M.S)

**Dr.Santosh T. Kute**
Head, Dept. of Economics,
Arts & Science Mahila College,
Mehakar, Dist. Buldana (M.S.)

**Michael Strayss,**
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

**Dr. P. N. Deshmukh**
Director, Physical Education,
Smt. S.D.D. Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.)

**EXECUTIVE EDITORS**

**B.R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Hyderabad. (A.P.)

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
& Cultural Studies,
University of Barlin,
Bariln (Germany)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Robert Huet**
Professor, Dept. Of History,
University of Lowa (USA).

**Dr. Karamsingh Rajput**
Head Dept. of Economics,
Lokmanya Tilak College,
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**CO-EDITORS**

**Prof. Veeraprasad**
Dept. of Political Science & P. A.,
S.K. University,
Anantpur (A.P.)

**Dr. Babasaheb Gore**
Principal,
Smt. Sushiladevi Deshmukh Mahila
College, Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History
Lokhevan University, Lokheavan,
Pensulviya, (USA)

**Dr. Baban D. Todkar**
Head, Dept. Defence Study
New Arts, Sci.& Comm. College
Ahmednagar, (M.S.)

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

143.

RNI. MAHMUL02937/2010/35848

**IMPACT FACTOR - 3.38**

ISSN 2229-6190

SOCIAL GROWTH

Issue : XIII, Vol. II, Nov. 2016 To April 2017

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | FDI and Opportunities in India Retail Market | Dr. Dileep S. Arjune | 1-7 |
| 2 | Arya Samaj in Deccan : A Historical Study | Dr. V. L. Dharurkar, B. M. Muskawad | 8-14 |
| 3 | Information Seeking Behavior of Disance Education Students in Sellected area of Maharathwada Region (Maharashtra) | Ravindra D. Bhatane, Dr. Balaji Dhakne | 15-22 |
| 4 | A Comparative Study on Body Proportionality of all India and West Zone inter University Level Male Handball Players | Sayyad S. Noor | 23-35 |
| 5 | शिवकालीन महाराष्ट्रातील व्यापार व पैसानिर्मिती | डॉ. युगंधरा टोपरे | 36-40 |
| 6 | भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्था | सुनिता सावरकर | 41-44 |
| 7 | भारतातील अन्नसुरक्षितता | [illegible] | 45-48 |
| 8 | स्त्री शिक्षण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. अशोक ए. मोटे | 49-53 |
| 9 | नागपूर येथील –ंडा सत्याग्रह | [illegible] | 54-58 |
| 10 | भारतीय राजकीय पक्षांचे विश्लेषण | [illegible] | 59-63 |



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

144.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 3.38 ISSN 2229-6190

SOCIAL GROWTH Issue : XIII, Vol. II, Nov. 2016 To April 2017 36

5

# शिवकालीन महाराष्ट्रातील व्यापार व पैसानिर्मिती

डॉ. युगंधरा टोपरे
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद, जि. औरंगाबाद

*Research Paper - Economics*

## गोषवारा

*'इतिहासाचा कोणताही कालावधी जेव्हा इतर कालावधीपेक्षा जास्त लक्ष वेधून घेतो तेव्हा तो काळ क्रांतीकारी असतो किंवा प्रगतीचा पाया रचणारा असतो.' असे विधान रॉबर्ट ऑरम या ब्रिटीश अभ्यासकाने केले. या क्रांतिकारी कालावधीचा शोध घेतांनाच शिवाजी महाराजांच्या राज्यनीतीचा व शिवाजी राजांचा व्यक्ती म्हणून शोध घेतांना 'फॅक्टरी रेकॉर्डस्' हा संग्रह विकसित केला. ज्याचा उपयोग शिवकालीन अर्थनीती, समाजनीती, राज्यनीती, युद्धनीती समजुन घेण्यासाठी होतो.*

*प्रस्तुत शोधनिबंधात शिवकालीन महाराष्ट्राची आर्थिक जडणघडण स्पष्ट करतांना प्रामुख्याने सागरी तटावरील बंदरांद्वारे व्यापार कसा विकसित केला व त्याद्वारे जकात निर्मिती कशी करण्यात आली याचे प्रामुख्याने विवेचन केले असून आरमार विकासासोबतच व्यापारवृद्धी हा दृष्टीकोन ठेवून शिवाजी महाराजांनी केलेला बंदराचा विकास स्पष्ट केला आहे. नारळाच्या व्यापारासाठी आजरा, अकोला, बांदा, तर तांदुळासाठी भटकल, मीठाच्या व्यापारासाठी दाभोळ, जहाजबांधण तसेच दुरूस्तीसाठी कुलाबा येथे स्वतंत्र बंदर त्यांनी निर्माण केले. लाकूड, मीठ व विविध प्रकारची वस्त्रे यांचा व्यापार या बंदरावरून मुख्यत: चालत होता.*

*शिवकालीन चलन व्यवस्थेचा विचार करतांना असे लक्षात येते की, एकसंघ किंवा संविधानिक अशा चलनी नाण्यांचा वापर होत नसला तरीही व्यापारवृद्धीच्या विचारातून व आर्थिक साम्राज्यास मान्यता मिळण्याच्या दृष्टीकोनातून 'शिवराई', 'छत्रपतीपैसा', होन अशी नाणी शिवाजीराजांनी विकसित केली. ही नाणी प्रामुख्याने सोने, चांदी व तांब्याच्या धातूची होती. शिवकालीन तांब्याची नाणी नंतरही*

Govt. College of Arts & Science

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

145.

*पेशवाईपर्यंत प्रचलित होती. या नाण्यांचे आंतरिक मूल्य व्यवस्थित असावे व त्याचा व्यापारावर परिणाम होऊ नये यासाठी टाकसाळी निर्माण केल्या गेल्या. अलिबाग, भिवंडी, वेंगुर्ला, कळवा, वसई, नागोठणे, कल्याण इत्यादी ठिकाणच्या टाकसाळी पेशवेकाळापर्यंत सुरू होत्या. चलन पुरवठा कमी पडून व्यापार संकुचित होऊ नये यासाठी महाराजांनी प्रयत्न केले.*

*शिवाजी महाराजांनी विकसित केलेल्या व्यापारी केंद्राचा, करविषयक प्रणालीचा व नाणीनिर्मितीचा महाराष्ट्राच्या आर्थिक जडणघडणीत निश्चितच मोलाचा वाटा आहे.*

''इतिहासाचा कोणताही कालावधी जेव्हा इतर काळापेक्षा जास्त लक्ष वेधून घेतो तेव्हा तो काळ क्रांतीकारी असतो किंवा प्रगतीचा पाया रचणारा असतो. त्यामुळेच त्याचा शोध घेणे आवश्यक ठरते. मराठा साम्राज्याचा संस्थापक शिवाजी, ज्याने भारतीय उपखंडात दबदबा निर्माण केला त्याच्याबद्दल योग्य आणि पुरेशी माहिती उपलब्ध नाही.'' हे विधान ब्रिटीश अभ्यासक रॉबर्ट ऑरम याने केले. शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याचा आढावा घेण्यासाठी 'फॅक्टरी रेकॉर्ड' या नावाने शिवाजी महाराजांच्या कार्यासंदर्भातील तथ्ये शोधून त्यांचा संग्रह केला. हा संग्रह अभ्यासकांसाठी मोलाचा आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती संदर्भात समकालीन संशोधकांनीही याबाबत मोलाची भर घातली आहे. रॉबर्ट ऑरम यांच्या उपरोक्त विधानातूनच हे लक्षात येते की, मराठा साम्राज्यासोबतच महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया रचण्याचं काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले आहे. साम्राज्य विस्तारासाठी लढणारे मुस्लिम राजे आणि वसाहतवादी व व्यापारवादी ब्रिटीश यांना लढा देतांना शिवाजी महाराजांनी रयतेच्या सुरक्षेसोबतच गड किल्ल्यांचा विस्तार, संवर्धन करून हिंदू साम्राज्याची पायाभरणी केली. ही पायाभरणी करतांना कृषी धोरण, महसूल विषयक धोरण, परकीय व्यापार, नाणी व चलन पद्धती, करआकारणी यासारख्या अनेक अर्थविषयक बाबींसंदर्भात प्रभावी धोरण राबवले. प्रस्तुत शोधनिबंधात याच शिवकालीन धोरणांचा महाराष्ट्राचा जडणघडणीत कसा वाटा आहे याचा उहापोह करून त्या धोरणांची आजच्या काळातील समर्पकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यत: परकीय इतिहासकारांच्या दृष्टीतून शिवकालीन स्थिती कशी होती याचे अर्थविषयक बाबींच्या संदर्भातील विवेचन हा या निबंधाचा गाभा आहे. निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**उद्दिष्टे :**

१. शिवाजी महाराजांच्या काळातील विविध आर्थिक धोरणांचा उहापोह करणे.

२. शिवकालीन आर्थिक स्थितीची आजच्या काळातील समर्पकता अभ्यासणे.

**अभ्यासासाठी वापरलेले स्रोत :**

प्रस्तुत निबंधासाठी मुख्यत: 'इकॉनॉमिक अ‍ॅण्ड पॉलिटिकल विकली' या संशोधन पत्रिकेतील निवडक वर्षातील शोधनिबंध, तसेच संकेत स्थळावर उपलब्ध असलेले ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी काळातील 'फॅक्टरी रेकॉर्डस्' चे भाग प्रामुख्याने वापरले आहेत. शोधगंगा संकेतस्थळावरील पीचए.डी. शोधप्रबंधाचा ही अभ्यासस्त्रोत

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

146.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 3.38
SOCIAL GROWTH ISSN 2229-6190
Issue : XIII, Vol. II, Nov. 2016 To April 2017 

म्हणून वापर केला आहे.

**परकीय व्यापार आणि पश्चिम किनारपट्टीवर बंदराचे नियोजन :**

शिवाजी राजांनी साम्राज्य विस्तारासोबत व्यापारासाठी आरमार व बंदरे आवश्यक आहेत हे जाणले होते. सागरी मार्गाने परकीयांचा देशात होणारा प्रवेश रोखण्यासोबतच व्यापार विस्तार हा उद्देश ठेवून महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर बंदरे निर्माण केली. त्यातील प्रत्येक बंदर हे वस्तूच्या व्यापारासंदर्भात प्रसिद्ध होते. नारळीच्या व्यापारासाठी अंकोला, नांदा, भातासाठी भटकल, वस्त्रोद्योगासाठी भिवंडी, मीठाच्या व्यापारासाठी दाभोळ, जहाजबांधणी तसेच दुरूस्तीसाठी त्यांनी कुलाबा येथे स्वतंत्र बंदर निर्माण केले. या बंदरावरून प्रामुख्याने लाकूड, मीठ आणि विविध प्रकारचे कपडे यांचा व्यापार चालत असे. कारवार आणि खारेपाटण या ठिकाणाहून नारळाचा व्यापार चालत असे. महड आणि मालवण या ठिकाणी नौकाबांधणी व दुरूस्तीचे कारखाने शिवाजी राजांनी उभे केले होते. पेण व राजापुरीची खाडी ही ठिकाणे आरमारी डावपेचासाठी निवडली गेली होती. मात्र सागरतटावरील ही सर्व ठिकाणे व्यापाराची बंदरे होती. समुद्रीमार्गाने होणारा शत्रुचा धोका लक्षात घेऊन सशक्त आरामाराची उभारणी करणारा आणि त्यासोबतच आर्थिक साम्राज्य वाढवण्यासाठी व व्यापारवाढीसाठी बंदरांची निर्मिती आणि व्यवस्थापन करणारा शिवाजी हा खऱ्या अर्थाने 'जाणता राजा' होता. बंदरामधून होणाऱ्या व्यवहारातूनही शिवकालीत महसूल निर्माण होत होता. त्याला 'जकात' म्हटले जाई. आधुनिक काळात सरकारला महसूली उत्पन्नाचे अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत उदा: कर आकारणी शुल्क, किंमत स्वरूपात मोबदला, दंड, सक्तीची वसुली इत्यादी. मात्र शिवकाळात मात्र सरकारी उत्पन्नाची साधने मर्यादित होती. त्यामुळेच एक कुशल प्रशासक आणि राज्यकर्ता म्हणून शिवाजी राजांनी उत्पन्न वाढवून प्रजा सुखात रहाण्यासाठी आपले सर्व कौशल्य पणाला लावले.

**कर आकारणी पद्धती व सरकारी उत्पन्न निर्मिती :**

शिवाजी राजांच्या काळात शेतीवर महसूली कर आकारला जात होता. गावातील पाटील सर्व गावातून महसूल जमा करून देशमुखांकडे देत असे. ईमानपट्टी, सराफपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी, तेलपट्टी असे विविध प्रकारचे कर प्रत्यक्ष स्वरूपात जमा केले जात. मात्र सक्तीची करवसूली कधीच केली जात नव्हती.

**शिवकालीन मुद्रा व चलन व्यवस्था :**

आधुनिक काळात देशाची मुद्रा किंवा चलन छापणे, वितरीत करणे व त्याचे नियमन करणे यासाठी मध्यवर्ती बँक कार्य करते. कोणत्याही देशातील मुद्रेचे मूल्य हे त्या देशाची आर्थिक स्थिती व पत दर्शवत असते. शिवाजी राजांच्या काळातही पोर्तुगीज तसेच मुस्लीम शासकांनी तयार केलेली नाणी अस्तित्वात होती. मात्र शिवाजी राजांनी स्वत:च्या आर्थिक साम्राज्याचा विस्तार व्हावा या हेतूने 'होन' हे चलन अस्तित्वात आणले. शिवकाळात छत्रपती किंवा शिवराई, तिरूका, पैसा, दाम ई. तांब्याची नाणी प्रचलित होती. छोट्या छोट्या व्यवहारांसाठी कवड्यांचा वापर केला जात असे. 'होन' ही नाणी सुवर्णाची होती. युरोपियन इतिहासकारांच्या मते, 'होन' हे सोन्याचे शिक्के किंवा नाणे होते. त्याचा वापर गोवळकोंडा व बीजापूर

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

147

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 3.38
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XIII, Vol. II, Nov. 2016 To April 2017


साम्राज्यातही केला जाई. त्या काळात सोन्याच्या नाण्यांचे आंतरिक मूल्य हे त्यात वापरल्या गेलेल्या सोण्याच्या कणांनुसार ठरवले जाई. त्यामुळेच प्रत्येक सुवर्णमुद्रेचे वजन एकसारखे नसे. नाण्याचे 'वरकरणी मूल्य' हे राजाकडून ठरवले जात असे. मात्र जुन्या नाण्यांचे मूल्य हे नवीन नाण्यांच्या मूल्यांपेक्षा कमी असे. 'होन' या सुवर्ण मुद्रेस दक्षिण भारतात जास्त लोकप्रियता लाभली. त्यामुळे मुस्लिम शासक व डच व्यापारी यांनी देखील 'होन' निर्मिती केली. शिवकाळात सूवर्ण, चांदी व तांबे या तीनही धातुंची नाणी प्रचलित होती.

सभासद बखर तसेच ब्रिटीशांचे फॅक्टरी रेकॉर्डस् मध्ये देखील विविध नाण्यांची यादी आढळून येते. शिवकाळात भिन्न प्रकारच्या सुवर्णमुद्रा होत्या– मोहर, पुतळी, सणगिरी, शिवराई, पातशाही, देवराई, अच्युतराई, रामचन्द्रराई, सतनामी, इब्रहिमी, धारवाडी, कोवरी पाक, ताडपत्री, बेलोरी, कुनगोरी, रामनाथपुरी अशा विविध नावांनी ही नाणी प्रचलित होती. 'मोहर' ही सुवर्णमुद्रा प्रामुख्याने भेटवस्तू म्हणून दिली जात असे. १६६३ मध्ये एका मोहरची किंमत १३ रू. होती. सभासद बखरीनुसार असे म्हणतात की, 'शिवराई होन' हे नाणे शिवाजी महाराजांनी सुरू केले. मात्र इतिहासकारांच्या मते टाकसाळीत खूप मोठ्या प्रमाणावर सुवर्णमुद्रा शिवाजी महाराजांनी निर्माण केल्या नाहीत कारण बाजारात सोन्याची नाणी माफक प्रमाणात उपलब्ध होती.

बखरींमध्ये सुवर्णचक्र किंवा सुवर्णचक्रम् असाही नाण्यांचा उल्लेख आढळतो. परंतु त्यात पूर्णपणे सोने समाविष्ट नसून इतरही धातूंचे मिश्रण आढळत होते. डॉ.कल्पना जोशी यांच्या शोधप्रबंधात होन व छत्रपती चक्रमचा विनिमय दर स्पष्ट केला असून १०० होन = १६० छत्रपती चक्र असा विनिमय दर आढळतो.

शिवाजी महाराजांनी प्रचलित केलेली नाणी शिवराई व छत्रपती पैसा या नावाने ओळखली जात होती. ही नाणी तांब्याची होती व रोजच्या सर्वसाधारण व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापरली जात होती, शिवाजी राजांनंतर पेशवाईतही काही काळापर्यंत ही नाणी प्रचलित होती. या तांब्याच्या नाण्यांचे वजन १० ते ११ ग्रॅम इतके होते.

वास्तविक शिवकाळात तसेच १७ व्या शतकापर्यंत वैध चलन किंवा एकात्मिक चलन अशी संकल्पना नव्हती असे दिसते. मात्र व्यापारवाढीसाठी नाण्यांचा उपयोग केला जात असे. खाजगी टाकसाळी उघडण्याचा परवानाही सरकारतर्फे दिला जात असे. शिवकाळात चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला पेण इत्यादी गावे व्यापारी केंद्र म्हणून ख्यात होती. यातील बहुतेक ठिकाणी शिवाजी महाराजांनी टाकसाळी स्थापन केल्या. व्यापार करतांना नाण्यांची टंचाई जाणवू नये हा त्यामागील हेतू होता. अलिबाग, भिवंडी, वेंगुर्ला, कळवा, वसई, नागोठणे, कल्याण, राजापूर इ. ठिकाणी टाकसाळी पेशवेकाळापर्यंत होत्या. यावरून असे स्पष्ट होते की व्यापारासाठी आर्थिक व्यवहार करतांना चलनाची टंचाई होऊ नये हा महाराजांचा मुख्य उद्देश होता जरी त्याकाळी एकाच राजाने प्रचलित केलेले चलन वापरणे बंधनकारक नव्हते तरीही चलनाचा पुरवठा व मागणी यांचा विचार करून महाराजांनी टाकसाळी सुरू केल्या यात त्यांची आर्थिक दूरदृष्टी दिसून येते. आजही आपण व्यापारी धोरण ठरवतांना चलनांची उपलब्धी, रोखता या बाबी विचारात घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे शिवाजीराजांचे हे धोरण आजच्या काळातही तेवढेच समर्पक आहे.

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

148

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 3.38
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XIII, Vol. II, Nov. 2016 To April 2017 

**निष्कर्ष :**

महाराष्ट्राच्या आर्थिक जडणघडणीत शिवाजी महाराजांचा मोलाचा वाटा आहे. परकीयांना मराठी मुलुखापासून दूर ठेवत युद्ध नीतीसोबतच आर्थिक नीतीचा अवलंब करत शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राचा विकास करण्याचा प्रयत्न केला. विविध प्रकारच्या कर आकारणी पद्धतीतून खजिना वाढवून रयतेसाठी विविध ा उपाययोजना केल्या हे करतांना त्यांनी सागरी तटावरील बंदरे विकसित करून आरमार सुसज्ज तर केलेच पण व्यापार वाढावा यासाठी व्यापारी केंद्रे विकसित केले. या व्यापारी केंद्रातून 'जकात' प्राप्त होत असे. ज्याचा शिवाजीराजांना उत्पन्न वाढवण्यासाठी उपयोग झाला. त्यामुळेच असे म्हणता येते की आजच्या काळातल्या सारखी चलन व्यवस्था किंवा प्रभावी बँक प्रणाली नसतांनाही नाणी पद्धती विकसित करून व्यापार वाढवण्यासाठी शिवाजी महाराजांनी प्रयत्न केले. व्यापार वाढवण्यासाठी बंदरे विकसित करून मोठ्या प्रमाणावर व्यापारी केंद्रे निर्माण केली. आजही कोकण किनारपट्टीवरील बंदरे, छोटी बेटे तितक्याच प्रभावीपणे आर्थिक साम्राज्याचा भाग म्हणून वापरली जातांना दिसतात.

## संदर्भ सूची

1- English Records on Shivaji (1659-1682) शिवचरित्र कार्यालय, 1931] (Rerebook society of india.org)

2- G.T.Kulkarni, Land Revenue and agricultural policy of Shivaji : an apprisal Bulletin of the Deccan College Post-Graduat and Research Institute, Vol. 35 No. 3/4, 1976. (http://www.jstor.org)

3- B.S. Shastry, Commercial Policy of the Portuguese vis-à-vis The Adilshahis of Bijapur in the 17th Century A.S Proccedings of Indian History Congress, Vol-48, 1987 (https://www.jstor.org)

4- B.G. Tamaskar, Ports and Harbours of Shivaji's Kingdom, Proccedings of the Indian History Congress, Vol. 40 (1979), (https://www.jstor.org)

5- Malavika Vartak, Shivaji Maharaj : Growth of a Symbol, Economic and Political Weekly, Vol. 34, May 1999. (https://www.jstor.org)

6- Ph.D. Thesis, A Study of Coins and Seals of Chhatrapati Shivaji's, Joshi Kalpana, Devi Ahilya Vishwa Vidyalaya (Shodhganga.inflibnet.ac.in)

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad